शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून राज्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम, एम.बी.ए.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व (पीजीडीएम) पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.१३१/तांशि-४

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १० जून, २०१९.

वाचा :- १) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/५२९, दि. १७.०५.२०१९.

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/५५४, दि. २४.०५.२०१९.

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/५६८, दि. २९.०५.२०१९.

४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २/ एनजीपी /मान्यता/२०१९/५८४, दि. ३.०६.२०१९.

प्रस्तावना :

उपरोक्त नमूद पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून राज्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम, एमबीए.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व (पीजीडीएम) पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करीता प्राप्त मान्यतेच्या यादीनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून विविध संस्थामधील विविध अभ्यासक्रमांसाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यास शासन मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

**शासन निर्णय :**

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये सोबतच्या Annexture "A" **व** Annexture "B" मध्ये दर्शविल्यानुसार अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम, एम.बी.ए.पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम व (पीजीडीएम) पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या अनुक्रमे ३७ व २ नवीन संस्था सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१०) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०६१०१७३६१५९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, [illegible] postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, [illegible] ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.06.12 [illegible] +05'30'

**(संजय औ.धारुरकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, ३०५, शासकीय तंत्रकिनेतन इमारत,४९, खेरवाडी,अलियावर जंग मार्ग, बांद्रा(पूर्व), मुंबई ४०००५१
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये) संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत.(
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
५. कुलसचिव, डॉबाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ., लोणेरे, रायगड
६. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

९. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, कम्बाईन्ड काऊन्सिल बिल्डींग, कोटला रोड, ऐवान-ए-गालिब मार्ग, नवी दिल्ली ११०००२-

१०. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.

११. कक्ष अधिकारी (तांशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. निवड नस्ती/तांशि-४

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

| Sr. No. | Current Application Number | Institute Name | Institute Address | District | Institution Type | Name of Parent Organisation(Trust) | Organisation(Trust) Address | Program | University | Level | Name of Course | Shift | Full Time/ Part Time | Intake Approved for 2018-19 | Intake Approved for 2019-20 (AICTE) | Intake Approved for 2019-20 (GOVT.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 19 | 1-[illegible] | DELONIX SOCIETY'S BARAMATI COLLEGE OF PHARMACY | BARAMATI PATAS ROAD, BARHANPUR, BARAMATI | PUNE | Unaided - Private | DELONIX SOCIETY | WARD D PROPERTY NO 369, KASAB GALLI | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |
| | | | | | | | | | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 20 | 1-4647555251 | FABTECH COLLEGE OF PHARMACY | GAT NO 565/1 PANDHARPUR ROAD, | SOLAPUR | Unaided - Private | FABTECH EDUCATION SOCIETY | J-508 AND 509 M.I.D.C., BHOSARI, PUNE - 411 026 MAHARASHTRA INDIA | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |
| | | | | | | | | | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 21 | 1-4720294831 | S S P SHIKSHAN SANSTHAS SIDDHI COLLEGE OF PHARMACY | SR NO 1157-1160 NEVALE VASTI CHIKHALI PUNE | PUNE | Unaided - Private | SSP SHIKSHAN SANSTHA | SR. NO 13/1 GANESH NAGAR DAPODI PUNE | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| | | | | | | | | | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 22 | 1-43968[illegible] | SAMARTH COLLEGE OF PHARMACY | A/P BELHE (BANGARWADI), TAL JUNNAR DIST PUNE STATE MAHARASHTRA | PUNE | Unaided - Private | SAMARTH RURAL EDUCATIONAL INSTITUTE | RAJURI | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| | | | | | | | | | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 23 | 1-4802410371 | ASHOKRAO MANE INSTITUTE OF PHARMACY AMBAP | A/P AMBAP TAL HATKANANGLE DIST KOLHAPUR | KOLHAPUR | Unaided - Private | SHRI BALASAHEB MANE SHIKSHAN PRASARAK MANDAL AMBAP | A/P AMBAP TAL HATKANANGLE DIST KOLHAPUR | PHARMACY | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| | | | | | | | | | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 24 | 1-4290336781 | SHRI SANT GAJANAN MAHARAJ COLLEGE OF PHARMACY | SAGWAN ROAD NEAR PALNA GHAR BULDANA DIST BULDANA 443001 | BULDHANA | Unaided - Private | DWARKA BAHUUDESHIYA GRAMIN VIKAS FOUNDATION | CHAITANYA WADI, NEAR LIC OFFICE, BULDANA DIST BULDANA 443001 | PHARMACY | Sant Gadge Baba Amravati University, Amravati | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |
| | | | | | | | | | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | DIPLOMA | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 60 | 60 |
| 25 | 1-4335909531 | DR R N LAHOTI INSTITUTE OF PHARMACEUTICAL EDUCATION AND RESEARCH CENTER | AT POST SULTANPUR JALNA ROAD TQ LONAR DIST BULDHANA MAHARASHTRA 443302 | BULDHANA | Unaided - Private | ADARSHA BAHUUDDESHIYA SHIKSHAN PRASARAK MANDAL SULTANPUR | AT POST SULTANPUR TQ LONAR DIST BULDHANA PIN 443302 (MAHARASHTRA) | PHARMACY | Sant Gadge Baba Amravati University, Amravati | UNDER GRADUATE | PHARMACY | 1st Shift | FULL TIME | 0 | 100 | 100 |

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबत.

फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.५१९/तांशि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ जुलै, २०२५.

**संदर्भ** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एन्जीसी/पीसीआय-मान्यता/६९३७ /४७४_२०, दि.१०.०६.२०२५.

प्रस्तावना : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या प्रस्तावानुसार, **फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी,** सांगोला या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत सोबतच्या **"प्रपत्रामध्ये"** दर्शविल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.
२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

FABTECH COLLEGE OF PHARMACY

३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासोबत करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय / संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय / संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने / संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

FABTECH COLLEGE OF PHARMACY SANGOLA

४.    हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७०९१७५६१८०००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.07.09 17:58:02 +05'30'

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवडनस्ती (तांशि-४)

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

FABTECH COLLEGE OF PHARMACY SANGOLA

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No.Manyata-2025/C.R.519/TE-4, Dated : 9th July, 2025

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2025-26

| Sr.No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | UNIVERSITY NAME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | Course Status | INTAKE APPROVED . for 2024-25 | INTAKE APPROVED for 2025-26 | VARIATION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 6937 | PCI-3277 | Fabtech College of Pharmacy Sangola | Un-Aided | PHARMACY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, Raigad | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutics | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | | | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmaceutical Quality Assurance | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |

PRINCIPAL
Fabtech College of Pharmacy
Sangola

THORAT
AJITKUMAR
ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.07.09 17:58:12 +05'30'

FABTECH COLLEGE OF PHARMACY SANGOLA